महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १६० वे दिनांक : ०५/०६/२०२६ वार : शुक्रवार

## सांगली-साताऱ्यात रंगणार तिरंगी रणसंग्राम : फडणवीस-शिंदेंच्या चर्चेनंतर तानाजी पाटील बाहेर



**सांगली :** सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकीचे चित्र अखेर स्पष्ट झाले असून या मतदारसंघात तिरंगी लढत रंगणार आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम राहिले आहेत. भारतीय जनता पक्षाचे धैर्यशील कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभयसिंह जगताप आणि अपक्ष उमेदवार किशोर धुमाळ यांच्यात थेट सामना होणार आहे. त्यामुळे या मतदारसंघातील निवडणूक राज्यातील सर्वाधिक चर्चेच्या लढतींपैकी एक ठरणार आहे.

अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. शिवसेनेशी संबंधित अपक्ष उमेदवार तानाजी पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यानंतर काँग्रेसचे नगरसेवक संजय मेंढे आणि मयूर पाटील यांनीही माघार घेतली. तसेच अपक्ष उमेदवार बाळासाहेब पाटील यांनीदेखील निवडणुकीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या सर्व माघारींनंतर निवडणुकीतील चित्र अधिक स्पष्ट झाले आणि अखेर तीनच उमेदवार मैदानात उरले.

तानाजी पाटील यांच्या माघारीमागे महायुतीतील समन्वयाचे राजकारण असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाल्यानंतर महायुतीचा धर्म जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. तानाजी पाटील यांना भविष्यात योग्य राजकीय सन्मान दिला जाईल, असे आश्वासनही त्यांना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. स्वतः तानाजी पाटील यांनीदेखील आपल्या उमेदवारीमुळे महायुतीत कोणताही तणाव निर्माण होऊ नये, म्हणून वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेनुसार अर्ज मागे घेतल्याचे स्पष्ट केले.

निवडणुकीच्या अंतिम यादीत भारतीय जनता पक्षाचे धैर्यशील ज्ञानदेव कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभयसिंह जगताप आणि अपक्ष उमेदवार किशोर धुमाळ यांचा समावेश आहे. धैर्यशील कदम हे महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून मैदानात आहेत, तर अभयसिंह जगताप यांना महाविकास आघाडीचा पाठिंबा आहे. दुसरीकडे किशोर धुमाळ यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्धार कायम ठेवला आहे. त्यामुळे मतांचे विभाजन आणि स्थानिक पातळीवरील समीकरणे या निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

या मतदारसंघाच्या मागील निवडणुकीत काँग्रेसचे मोहनराव कदम विजयी झाले होते. त्यामुळे यावेळीही या जागेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील थेट संघर्षासोबतच अपक्ष उमेदवाराचा प्रभाव किती पडतो, हेही महत्त्वाचे ठरणार आहे. अर्ज माघारीनंतर अनेक मतदारसंघांतील निवडणुका बिनविरोध झाल्या असल्या, तरी सांगली-सातारा मतदारसंघात मात्र चुरशीची लढत निश्चित झाली आहे. आता १८ जून रोजी होणाऱ्या मतदानानंतर या प्रतिष्ठेच्या लढतीत कोण बाजी मारणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## गडचिरोलीतील मायनिंगवर आदित्य ठाकरेंचा स्फोटक आरोप : टायगर कॉरिडॉर उद्ध्वस्त करण्याचा डाव



**मंबई :** गडचिरोली जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या खाण प्रकल्पावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. गडचिरोलीतील काही भागांमध्ये आपल्या जवळच्या उद्योगपतींना लाभ मिळावा यासाठी खाणकाम प्रकल्पांना परवानगी दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे हा प्रकल्प संरक्षित वाघ मार्गिकेच्या परिसरात येत असल्याचा दावा करत त्यांनी हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सरकार आणि वन विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

आदित्य ठाकरे यांनी सांगितले की, मागील महिन्यात लोहा डोंगरी परिसरात खाणकाम सुरू करण्याच्या हालचाली झाल्या होत्या. गडचिरोलीतील हेद्री आणि आसपासच्या गावांमध्येही अशाच प्रकारचे प्रकल्प प्रस्तावित असल्याची माहिती त्यांना मिळाली आहे. या भागाचा समावेश संरक्षित वाघ मार्गिकेत होत असल्याचा दावा करत त्यांनी या परिसराला अधिकृत टायगर कॉरिडॉर म्हणून घोषित करण्याची मागणी केली. ताडोबा आणि इंद्रावती या दोन महत्त्वाच्या व्याघ्र क्षेत्रांना जोडणारा हा पट्टा असल्यामुळे येथे कोणत्याही प्रकारचे खाणकाम पर्यावरणासाठी घातक ठरेल, असे ते म्हणाले.

वन विभागाच्या निर्णय प्रक्रियेवरही आदित्य ठाकरे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांच्या मते, २८ एप्रिल २०२६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी यांच्याकडे ही जमीन खाणकामासाठी देता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर १३ मे २०२६ रोजी वन विभागाकडून ही जागा वन्यजीव मार्गिका नसल्याचा अहवाल सादर करण्यात आला. अवघ्या एका महिन्यात दोन वेगवेगळ्या भूमिका कशा घेतल्या गेल्या, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यामागे दबाव असल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला.

या प्रकरणात केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांना पत्र लिहिल्याची माहितीही आदित्य ठाकरे यांनी दिली. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना निलंबित करण्याची मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे. तसेच अशा प्रकारच्या प्रकल्पांना मंजुरी देताना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील वाघ पाहण्यासाठी पर्यटक ताडोबाला येतात, मात्र अशा महत्त्वाच्या मार्गिकांमध्ये खाणकामाला परवानगी दिल्यास वन्यजीवांच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी इतर राजकीय मुद्द्यांवरही भाष्य केले. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका केली. कोण आंदोलनात सहभागी होणार हा मुद्दा नसून सरकार विरोधकांच्या आंदोलनाला घाबरत आहे का, हा खरा प्रश्न असल्याचे ते म्हणाले. अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत त्यांनी सरकारने लोकशाही मार्गाने आंदोलने होऊ द्यावीत, अशी मागणी केली. गडचिरोलीतील खाण प्रकल्प, पर्यावरण संरक्षण आणि वन्यजीवांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर शिवसेना ठाकरे गटाचा विरोध कायम राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे काळाच्या पडद्याआड : वयाच्या ९३ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



**पुणे :** राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या या निधनामुळे संपूर्ण राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

पुण्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचे अनेक वर्षे नेतृत्व करणारे अनंतराव थोपटे यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात दीर्घकाळ कॅबिनेट मंत्री तसेच पुण्याचे पालकमंत्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर त्यांनी विधानमंडळात काँग्रेसच्या गटनेतेपदाची धुराही अत्यंत यशस्वीपणे पेलली. पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा विस्तार करण्यात आणि पक्ष तळागाळात रुजवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले असून, ते माजी आमदार आणि भाजप नेते संग्राम थोपटे यांचे वडील होते.

भोर तालुक्याच्या राजकारणात मोठे प्रस्थ असलेल्या थोपटे घराण्याचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांनी सलग ६ वेळा आमदारकी आणि तब्बल १४ वर्षे मंत्रिपद भूषवत या मतदारसंघाचे प्रदीर्घ काळ यशस्वी नेतृत्व केले. आपल्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेणाऱ्या अनंतरावांच्या शब्दाला काँग्रेस पक्षामध्येही मोठा मान होता. अनंतराव थोपटे यांचा राजकीय वारसा पुढे चालवणारे त्यांचे चिरंजीव संग्राम थोपटे हे सध्या राज्याच्या राजकारणात सक्रिय असले तरी, नुकत्याच पार पडलेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शंकर मांडेकर यांच्याकडून त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

पुण्यात काँग्रेस पक्ष तळागाळात रुजवून त्याची ताकद वाढवण्यात अनंतराव थोपटे यांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले असून, त्यांच्या या निधनाने काँग्रेस वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर, १९८३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पहिल्यांदा राज्यमंत्रिपदाची मोठी जबाबदारी सोपवली होती.

आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत अनंतराव थोपटे यांनी उच्च व तंत्रशिक्षण, मदत व पुनर्वसन, परिवहन, पशुसंवर्धन, दुग्धविकास, रोजगार हमी योजना, मत्स्यव्यवसाय आणि फलोत्पादन यांसारख्या अनेक महत्त्वाच्या खात्यांचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. या शासकीय जबाबदाऱ्यांसोबतच, त्यांनी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे संचालक म्हणूनही उल्लेखनीय कामकाज पाहिले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६


## कन्नड तालुक्यात खत विक्रीसाठी ऑनलाइन बुकिंग प्रणाली प्रशिक्षण संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि.05 जून पासून अनुदानित रासायनिक खतांची विक्री शेतकऱ्यांच्या ऑनलाइन बुकिंगद्वारे करण्यात येणार आहे. या नव्या प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कन्नड व पंचायत समिती, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेते व सेवा केंद्र चालक यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास तालुक्यातील मोठ्या संख्येने कृषी निविष्ठा विक्रेते व सेवा केंद्र चालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हरिभाऊ कातोरे यांनी ऑनलाइन बुकिंग प्रणालीची कार्यपद्धती, खत वितरण प्रक्रिया तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची सविस्तर माहिती दिली. कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) श्री. मनोज सैंदाणे व श्री. विश्वास अदापुरे यांनी संबंधित मोबाईल ॲप व पोर्टलच्या वापराबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.तसेच नायब तहसीलदार प्रशांत काळे यांनी शासनाच्या या उपक्रमामुळे खत वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येऊन शेतकऱ्यांना वेळेत व योग्य प्रमाणात खत उपलब्ध होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांनी सर्व कृषी निविष्ठा विक्रेते व सेवा केंद्र चालकांनी ऑनलाइन प्रणालीचा प्रभावी वापर करून शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन केले. शासनाच्या नव्या प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमास उपस्थितांनी ऑनलाइन बुकिंग प्रक्रियेबाबत विविध शंकांचे निरसन करून घेतले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले असून दि.05 जून पासून अनुदानित रासायनिक खत विक्रीसाठी ऑनलाइन बुकिंग प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## महाविद्यालयात उपस्थित राहून स्पर्धा परीक्षेची तयारी केली तर यश मिळेल



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालयातील कला शाखेचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी संदेश रंजीवन झाकडे याची भारतीय सैन्य दलातील निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. यावेळी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर तसेच महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. राजकुमार सोनवणे, आदी उपस्थित होते.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात झालेल्या सत्कार प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अस्वले यांनी महाविद्यालयात शिक्षण घेतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी विद्यार्थ्यांनी केली तर पदवी पूर्ण होताच सरकारी नोकरी मिळू शकते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात हजर राहून करिअर कट्टा, एन एस एस, एनसीसी, स्पर्धा मार्गदर्शन केंद्र, कौशल्य विकास केंद्र ग्रंथालय याचा वापर करावा. त्यासाठी पुणे, मुंबई जायची गरज नाही. महाविद्यालयातील या वर्षी २६ विद्यार्थी आर्मी आणि पोलिस भारती झाले आहेत. कठोर परिश्रम, जिद्द आणि शिस्त यांच्या बळावर पोलिस, आर्मी भरती प्रक्रियेत संपादन केल्यामुळे महाविद्यालयाची प्रतिष्ठा उंचावली आहे. विद्यार्थ्यांनीही त्याच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी 5 जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे. जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना 1972 मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने 5 जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि 1973 पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस 150 हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात. महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '50 कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत. हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे. पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत. 'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे. आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन, जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्त्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.



**भगवंत पाळवदे,**
अंबाजोगाई, बीड पर्यावरण मित्र

# पारंपरिक शिक्षणासोबत व्यावसायिक व तंत्रज्ञानाधारित शिक्षण घेणे गरजेचे - प्रा. श्रावण वनजे

भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेतीसोबत विविध उद्योग, व्यवसाय आणि सेवा क्षेत्रांचा विकास करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता आहे. जर युवकांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण घेतले, तर भारत अधिक समृद्ध आणि आत्मनिर्भर राष्ट्र म्हणून विकसित होईल. आजचा विद्यार्थी नवनवीन कल्पना, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगतीची नवी दारे उघडत आहे. त्यामुळे तांत्रिक शिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे.भारत हा वेगाने प्रगती करणारा आणि तंत्रज्ञानाकडे वाटचाल करणारा देश आहे. एकविसाव्या शतकात विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्योग, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्यामुळे तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यांपैकी एक आहे. राज्यात विविध तांत्रिक शिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि कौशल्य विकास केंद्रे कार्यरत आहेत. त्यामुळे दहावी व बारावीनंतर विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार विविध शाखांची निवड करून उज्ज्वल भविष्य घडवू शकतात.तांत्रिक शिक्षणामध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, माहिती तंत्रज्ञान (IT) अशा अनेक शाखा उपलब्ध आहेत. या शाखांमधून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान तसेच प्रत्यक्ष काम करण्याची कौशल्ये प्राप्त होतात. त्यामुळे ते रोजगारक्षम बनतात आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सक्षम होतात.पारंपरिक शिक्षण विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञान, विचारशक्ती, नैतिक मूल्ये आणि सर्वांगीण विकास प्रदान करते. परंतु आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ सैद्धांतिक ज्ञान पुरेसे ठरत नाही. व्यावसायिक व कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित होतात, आत्मविश्वास वाढतो आणि रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. अनेक विद्यार्थी नोकरीबरोबरच स्वतःचा व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करण्यासही सक्षम होतात.जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि सन्मानाने जीवन जगण्यासाठी कौशल्याधारित व तंत्रज्ञानाधारित शिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशा शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्षमता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि आत्मनिर्भरतेची भावना विकसित होते. आजच्या युगात कौशल्य हेच खरे सामर्थ्य आहे.म्हणूनच दहावी किंवा बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी केवळ मिळालेल्या गुणांचा विचार न करता आपल्या आवडी, क्षमता आणि करिअरच्या संधी लक्षात घेऊन शासकीय किंवा खाजगी तांत्रिक महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याचा विचार करावा. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून ते स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवू शकतात तसेच देशाच्या प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.म्हणूनच आजच्या काळात पारंपरिक शिक्षणासोबत व्यावसायिक व तंत्रज्ञानाधारित शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे. असे शिक्षण विद्यार्थ्यांना स्वावलंबी, कुशल, आत्मविश्वासू आणि यशस्वी नागरिक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

"विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तांत्रिक व कौशल्याधारित शिक्षण घेऊन स्वतःला सक्षम, स्वावलंबी आणि रोजगारक्षम बनवावे," असे प्रतिपादन प्रा. श्रावण वनजे यांनी केले.

**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)**
**विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**
**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६


# पर्यावरणसंवर्धन, शाश्वत विकास आणि मानवजातीचे भविष्य

मानव आणि निसर्ग यांचे नाते हे सृष्टीच्या निर्मितीइतकेच प्राचीन आहे. पृथ्वीवरील जीवनाची संपूर्ण व्यवस्था पर्यावरणावर आधारलेली आहे. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी, पर्वत, नद्या, समुद्र, जंगल आणि वातावरणातील विविध घटक यांच्या परस्पर संबंधातून पर्यावरणाची निर्मिती होते. पर्यावरण हा केवळ एक शब्द नसून तो जीवनाचा पाया आहे. आपण घेत असलेला प्रत्येक श्वास, आपण पित असलेले पाणी, आपण खात असलेले अन्न आणि आपल्या जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक नैसर्गिक गोष्ट पर्यावरणातूनच प्राप्त होते. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण म्हणजे मानवाच्या अस्तित्वाचे संरक्षण होय. परंतु गेल्या काही दशकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या झपाट्याने झालेल्या विस्तारामुळे पर्यावरणावर अभूतपूर्व ताण निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अविचारी वापर, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामान बदल यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.जागतिक पर्यावरण दिन हा जगातील सर्वात मोठा पर्यावरणीय जनजागृती उपक्रम मानला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून या दिवसाची सुरुवात झाली. १९७२ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे 'मानवी पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाची गरज आणि विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्व जगासमोर मांडण्यात आले. या परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७४ पासून या दिवसाचे औपचारिक आयोजन सुरू झाले. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध विषयांवर आधारित कार्यक्रम, मोहिमा, परिसंवाद, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. या दिवसाचा मुख्य उद्देश लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणीय समस्यांकडे लक्ष वेधणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृती करण्यास प्रेरित करणे हा आहे.पर्यावरणाचे महत्त्व समजून घेताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की मानव हा निसर्गाचा स्वामी नसून त्याचा एक अविभाज्य घटक आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्य असते. जंगल कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू निर्माण करतात. नद्या आणि जलस्रोत मानवाला पाणी उपलब्ध करून देतात. माती अन्नधान्य उत्पादनासाठी आवश्यक असते. विविध प्राणी आणि कीटक परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत करतात. या सर्व घटकांमधील सुसंवादामुळे पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे. परंतु मानवाने आपल्या गरजा आणि सुखसोयी वाढविण्यासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. परिणामी पर्यावरणीय संतुलन बिघडले आणि आज जग अनेक गंभीर संकटांचा सामना करत आहे.आजच्या काळातील सर्वात मोठी पर्यावरणीय समस्या म्हणजे हवामान बदल. औद्योगिक क्रांतीनंतर जीवाश्म इंधनांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले. हे वायू पृथ्वीभोवती उष्णतेचे आवरण निर्माण करतात आणि त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. या प्रक्रियेला जागतिक तापमानवाढ असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे, हवामानातील बदल तीव्र होत आहेत आणि नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत आहे. जगभरात दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी आणि चक्रीवादळे अधिक वारंवार घडू लागली आहेत. हवामान बदलाचा परिणाम केवळ पर्यावरणावरच नव्हे तर शेती, आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक जीवनावरही होत आहे.जंगल हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. जंगलांमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण नियंत्रित राहते, पावसाचे चक्र सुरळीत राहते आणि जैवविविधतेचे संरक्षण होते. पृथ्वीवरील लाखो वनस्पती आणि प्राणी जंगलांमध्ये आश्रय घेतात. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे, खाणकामामुळे, औद्योगिक प्रकल्पांमुळे आणि विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे. जंगलांचा ऱ्हास झाल्याने वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगलतोडीमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते आणि हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे वृक्षारोपण आणि वनसंवर्धन हे पर्यावरण संरक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.जलसंपदा ही मानवाच्या जीवनासाठी अत्यावश्यक आहे. पाणी नसल्यास जीवन अशक्य आहे. परंतु आज जगभरात जलसंकट तीव्र होत आहे. लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, शेतीसाठी होणारा अतिवापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन यांमुळे अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. नद्या आणि तलावांमध्ये औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक पदार्थ मिसळल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होते. भविष्यात पाणी हे संघर्षाचे प्रमुख कारण ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, जलप्रदूषण नियंत्रण आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.वायुप्रदूषण ही आधुनिक जगासमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. वाहनांचा धूर, कारखान्यांमधून होणारे उत्सर्जन, वीजनिर्मितीसाठी वापरले जाणारे जीवाश्म इंधन आणि कचरा जाळण्याच्या प्रक्रियेमुळे वातावरणात घातक वायूंचे प्रमाण वाढत आहे. वायुप्रदूषणामुळे दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयरोग आणि कर्करोगासारखे गंभीर आजार वाढत आहेत. अनेक महानगरांमध्ये हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. स्वच्छ हवा ही मानवाचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांचा वापर वाढविणे आवश्यक आहे.प्लास्टिक प्रदूषण हा पर्यावरणासाठी वाढता धोका आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे अनेक सुविधा निर्माण झाल्या असल्या तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. प्लास्टिक सहज विघटित होत नाही. त्यामुळे ते जमिनीमध्ये, नद्यांमध्ये आणि समुद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचते. समुद्रातील प्लास्टिक कचऱ्यामुळे सागरी जीवांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पक्षी आणि प्राणी प्लास्टिक गिळल्यामुळे मृत्युमुखी पडतात. सूक्ष्म प्लास्टिकचे कण आता मानवी शरीरातही प्रवेश करू लागले आहेत. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.पर्यावरणीय संतुलन टिकविण्यासाठी जैवविविधतेचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची विविधता म्हणजे जैवविविधता. जैवविविधतेमुळे परिसंस्था कार्यरत राहतात आणि मानवाला अन्न, औषधे, इंधन तसेच इतर अनेक संसाधने उपलब्ध होतात. परंतु अधिवासांचा नाश, प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे अतिरेकी शोषण यांमुळे अनेक प्रजाती धोक्यात आल्या आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा पर्यावरणीय संकटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे वन्यजीव संरक्षण, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांचे संवर्धन आवश्यक आहे.भारत हा जैवविविधतेने समृद्ध देश आहे. हिमालय, पश्चिम घाट, सुंदरबन, ईशान्य भारतातील जंगले आणि राजस्थानचे वाळवंट या विविध परिसंस्था भारतात आढळतात. भारतीय संस्कृतीत निसर्गाला विशेष स्थान आहे. वृक्षपूजन, नदीपूजन आणि प्राण्यांप्रती आदरभाव या परंपरा पर्यावरणपूरक जीवनशैलीचे प्रतीक आहेत. ऋषी-मुनींनी निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. आजच्या काळात या मूल्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.पर्यावरण संरक्षणामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होते. पर्यावरणीय समस्यांची जाणीव, संसाधनांचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक सवयी यांचा विकास शिक्षणाद्वारे होतो. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारखे उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना विकसित होते.विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतात. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैवऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या नूतनीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा वापर वाढविल्यास कार्बन उत्सर्जन कमी करता येते. इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, हरित इमारती आणि स्मार्ट तंत्रज्ञान यांचा वापर पर्यावरण संरक्षणासाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखता येऊ शकतो.कचरा व्यवस्थापन हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि उपभोगवादी जीवनशैलीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. योग्य व्यवस्थापन न झाल्यास कचरा पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करतो. घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत निर्मिती यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. 'कमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्निर्मिती करा' हे तत्त्व पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.शेती आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. जलप्रदूषण वाढत आहे आणि जैवविविधतेवर परिणाम होत आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत कृषी पद्धती पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. जलसंधारण, मृदसंवर्धन आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर यांमुळे शेती अधिक शाश्वत बनू शकते.पर्यावरण संरक्षणासाठी शासन, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. विविध कायदे, धोरणे आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु केवळ सरकारी यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. पाणी वाचवणे, वीज बचत करणे, झाडे लावणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात.शाश्वत विकास ही आजच्या काळातील सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही, अशा प्रकारे विकास करणे म्हणजे शाश्वत विकास होय. आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणीय न्याय, संसाधनांचे समान वाटप आणि हरित विकास या संकल्पनांवर भर देणे आवश्यक आहे.पर्यावरणीय संकटे ही कोणत्याही एका देशापुरती मर्यादित नाहीत. हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. विकसित आणि विकसनशील देशांनी समान जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संरक्षणासाठी कार्य करणे गरजेचे आहे.जागतिक पर्यावरण दिन हा आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की पृथ्वी ही केवळ आपल्या पिढीची मालमत्ता नाही. ती भावी पिढ्यांसाठी जपण्याची अमूल्य ठेव आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे भविष्याचे रक्षण करणे होय. प्रत्येक झाड, प्रत्येक नदी, प्रत्येक सजीव आणि प्रत्येक नैसर्गिक संसाधन पृथ्वीच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नाही तर मानवतेप्रती असलेली नैतिक बांधिलकी आहे.आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचा, नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याचा आणि पृथ्वीला अधिक हरित, स्वच्छ व सुरक्षित बनविण्याचा दृढ संकल्प करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधून मोठा बदल घडू शकतो. निसर्गाशी सुसंवाद साधून, शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारून आणि पर्यावरण संवर्धनाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवूनच आपण उज्ज्वल, सुरक्षित आणि समृद्ध भविष्याची निर्मिती करू शकतो. म्हणूनच या जागतिक पर्यावरण दिनी एकच संदेश सर्वत्र पोहोचला पाहिजे तो म्हणजे "पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा आणि मानवजातीचे भविष्य सुरक्षित करा."




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)*,

ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६

# जागतिक पर्यावरण दिन शासनाने साजरा करावा- डॉ. राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** आपल्या या अद्भुत ग्रहाचे रक्षण करण्यासाठी क्षणभर थांबून विचार करण्या साठी आणि कृती करण्यासाठी, दरवर्षी ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो परंतु वैयक्तिक जबाबदारीचे भान ओळखूनच जागतिक पर्यावरण दिन साजरा व्हावा असे प्रतिपादन आमच्या प्रतिनिधी सोबत बोलतांना जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केले.पुढे बोलतांना ते म्हणाले की,पर्यावरण दिन हा पर्यावरणाशी संबंधित जगातील सर्वात मोठ्या जागतिक कार्यक्रमांपैकी एक आहे. हा दिवस आपल्या ग्रहाला भेडसावणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना जगासमोर आणण्या साठी एक व्यासपीठ म्हणून कार्य करतो.म्हणुन आता २०२६ ची शास्वात संकल्पना तयार करून ती अंमलात आणण्याचा " संकल्प " शासनाने सर्व सेवाभावी संस्था,शिक्षण संस्था, युवा वर्ग आणि सर्व स्थरातील विद्यार्थी व नागरिकांच्या मदतीने करावा. 'जागतिक पर्यावरण दिन २०२६', हवामान बदल आणि हवामानविषयक कृतींना गती देण्यावर लक्ष केंद्रित करेल असा उद्देश निश्चित करून २०२६ ची ही संकल्पना हवामान बदलावर आधारित ठेऊन, एका न्याय्य आणि शाश्वत भविष्याची खात्री निर्माण करण्यासाठी आर्थिक व्यवस्थांचा पुर्नविचार करण्यावर आणि हवेच्या पर्यावरणाशी असलेले आपले नाते सुधारण्यावर कृती कार्यक्रम आखला पाहिजे.जागतिक पर्यावरण दिनाचा इतिहासजागतिक पर्यावरण दिन १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सुरू केला.हा दिवस गंभीर पर्यावरणीय समस्यां विषयी जागृती निर्माण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून स्थापित करण्यात आला. या बाबतची पहिली बैठक १९७२ मध्ये स्वीडन मधील स्टॉकहोम येथे पार पडली, जिथे या विषयावर सखोल चर्चा आणि विचारमंथन करण्यात आले. तेव्हापासून- १९७३ पासून, हा दिवस त्याच तारखेला साजरा करण्याची परंपरा अविरतपणे सुरू झालेली असुन जागतिक पर्यावरण दिनाचेमहत्त्व जागतिक पर्यावरण दिन विविध पर्यावरणीय समस्यांना जगासमोर आणतो, कृतीची तयारी करतो आणि पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देतो. विविध मोहिमा, कार्यक्रम आणि उपक्रमां च्या माध्यमातून, जागतिक पर्यावरण दिन लोकांना आणि समुदायांना बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित करणे हाच उद्देश शासन स्तरावर मोठ्या प्रमाणा वर घेऊन अति शाश्वत भविष्यासाठीपर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्याची आणि त्यांवर कृती करण्याची उर्मी लोकांमध्ये जागृत करण्याचा संकल्प शासनानेचे सेवाभावी संस्था व पर्यावरण क्षेत्रातील महनीय व्यक्ती यांच्या सहकार्याने हाती घेणे खुप महत्वाचे असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन जागतिक पर्यावरण दिन आणि वैयक्तिक जबाबदारी याची सांगड घालण्याची गरज त्यांनी पुढे आणली असुन जागतिक पर्यावरण दिन २०२६ चे हवामान बदलावर आणि हवामान विषयक कृतींना गती देण्यावर भर देऊन सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन याचे मुख्य कारण म्हणजे जगाला भेडसावणारी अनेक गंभीर पर्यावरणीय आव्हाने-नापीक झालेल्या जमिनींचे पुनरुज्जीवन केल्याने कार्बन शोषण्यास, वातावरणातील हरितगृह वायू कमी करण्यास आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यास मदत होणार असुन दुष्काळाचा सामना करण्याची क्षमता जर वाढविली तरच पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करता येणार असुन त्यासाठी " थ्री आर " पॅटर्न अंमलात आणण्यावर उपाय योजना करण्यावर जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी भर दिला असुन शेती,पिण्यासाठी आणि उद्योगासाठी आणि मानवी वापरासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरलेला वापर असुन अशा वेळी जेव्हा हवामान बदलामुळे दुष्काळाची वारंवारता आणि तीव्रता वाढते तेव्हाच पुनर्संचयित परिसंस्था विविध प्रजातींसाठी अधिवास प्रदान करण्याची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादित केली असुन याच बाबी भविष्यात जैवविविधतेला प्रोत्साहन देतील आणि जमिनीचा ऱ्हास रोखून जैव विविधतेच्या " हॉटस्पॉट् सना " नापीक आणि निर्जीव होण्यापासून वाचवतील असेही ते म्हणाले.अन्न सुरक्षेच्या महत्वाच्या विषयावर बोलतांना डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, सुपीक माती आणि पुनर्संचयित जमिनी कृषी उत्पादकते साठी अत्यावश्यक आहेत आणि वाळवंटी करण व दुष्काळ रोखल्यास वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नाचा स्थिर पुरवठा सुनिश्चित करणे तेव्हाच सोपे होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त करतांना ते म्हणाले की,आपल्या सर्वांना माहीत आहे की, जमिनीच्या ऱ्हासामुळे शेती, वनीकरण आणि पर्यटन क्षेत्रात आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असुन आणि पुनरुज्जीवन प्रकल्प रोजगार निर्माण करण्यावर आपली अप्रमाणिक कृती नियोजीत केल्यास अधिक शाश्वत आर्थिक वाढ होऊ शकते असेही प्रतिपादन करून पुढे ते म्हणाले की, निरोगी परिसंस्था स्वच्छ हवा, पाणी, घन कचरा व्यवस्थापन, वैद्यकीय कचरा, लोखंडी कचरा, इ वेस्ट आणि एकूणच पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत असुन गुणवत्तेत योगदान देतील असे कृती कार्यक्रम हाती घेण्यावर भर देण्याची महत्वाची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद करून जे की, मानवी आरोग्यासाठी अत्यावश्यक असल्याचे नमुद करून ते पुढे म्हणाले की,लवचिक भूदृश्ये पूर आणि भूस्खलन यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा धोका कमी करण्याचे स्रोत निर्माण करण्याची गरज नमुद करतांना जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी जन समुदायांवर अंत्यन्त विनाशकारी परिणाम होऊ शकतात असेही त्यांनी स्पष्ट पणे सांगितले या साठी आता वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यावर त्यांनी भर दिला असुन कमी करा, पुन्हा वापरा, पुनर्वापर करा या " थ्री आर " पद्धतीचे सूत्र जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी त्यांच्या इन्स्टिटयूट ऑफ अँपरोप्रिएट अँड सस्टेनेबल टेक्नॉलॉजी या संस्थेच्या वतीने आंतर राष्ट्रीय कीर्तीचे सायंटिस्ट प्रा डॉ आर बी चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या संशोधन असलेल्या पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन मध्ये संशोधनात्मक सविस्तर माहिती तयार केलेली आहे हेच तयार करण्यात आलेले पॉवर पॉईंट प्रेजेंटेशन खुप उपयुक्त ठरणार असल्याचे जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले. सर्वच कचरा कमी करणेशाश्वत वापर- स्थानिक पातळीवर उपलब्ध, शाश्वत आणि सेंद्रिय उत्पादने निवडल्याने उत्पादन आणि वाहतुकीचा पर्यावरणा वरील परिणाम कमी करता येऊ शकतो त्यासाठी ट्रॅफिक व्यवस्थापन, सिग्नल व्यवस्थापन, रस्ते व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन ज्यात ग्रे वॉटर,ब्लॅक वॉटर व पोटेबल वॉटर व्यवस्थापन त्यांच्या "स्मार्ट सिटी " या विषयावरील अंत्यन्त अभ्यासु " पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन " दिशादर्शक ठरणार असल्याचे स्पष्ट मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले.पुनर्वनीकरण आणि पुनर्संचयन प्रकल्पांना भविष्यात पाठिंबा देणे अंत्यन्त महत्वाचे ठरणार असुन स्थानिक पातळीवर विद्यार्थी, युवावर्ग,सेवाभावी संस्था-संघटना आदींच्या मदतीने वृक्षारोपण उपक्रमां मध्ये सहभागी करून घेण्यावर आता राजकीय पक्ष संघटना यांनी स्वतःचे एक " इनव्हायरमेंट प्रोटेक्शन विंग " तयार करून राजकीय प्रगल्भता मानव जातीच्या कल्याणा साठी निर्माण करून भूमी पुनर्संचय नावर काम करणाऱ्या संस्थांना आता पाठिंबा द्यावा लागणार असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले असुन स्थानिक भूदृश्ये आणि परिसंस्था पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने असलेल्या सामुदायिक प्रकल्पांमध्ये सर्वांनी सहभागी होण्यावर त्यांनी भर दिला असुन ऊर्जा-कार्यक्षम उपकरणे वापरणे आणिअक्षय ऊर्जा स्रोतांची निवड करणे.वैयक्तिक वाहनांतून होणारे कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यासाठी शासनाच्या वरिष्ठ अधिकारी, लोक प्रतिनिधी, विविध समाज सेवक, राजकीय पक्षांचे नेते पदाधिकारी यांनी आठवड्या तून एकदा विना वाहन ज्यात दुचाकी व चारचाकी वाहने यांचा वापर न करता सायकल वापरून एक आदर्श घालुन देण्याची महत्वाची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादीत केली असुन शाश्वत शेतीला पाठिंबा सुद्धा देण्यावर त्यांनी भर दिला असुन शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शेतांतून शेतकरी -कास्तकरी यांची सर्वच उत्पादने खरेदी करावी लाग तील तरच यामुळे जमिनीचे आरोग्य आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यास मदत होणार असुन स्थानिक शेतकऱ्यांना अधिकचा व भारदस्त शाश्वत पद्धतींना पाठिंबा देण्यासाठी'समुदाय-आधारित शेती' उपक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेउन सर्वच स्तरातील व्यक्ती संघटना एन जी ओ व पदाधिकारी यांचा सहभाग वाढविण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागतील असे स्पष्ट मतजेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त करून पर्यावरणीय बदलांचे निरीक्षण करणाऱ्याआणि संशोधन कार्यात मौल्यवान माहितीचे योगदान देणाऱ्या 'नागरिक विज्ञान' प्रकल्पांची निर्मिती करून या मध्ये परिणामकारक सहभाग वाढविण्याचा " स्पेशल पर्पज प्रोग्राम " डिजाईन करावा लागेल असे नमुद करून ते म्हणाले की, पर्यावरणीय निरीक्षणाच्या कामात लोकसहभाग वाढवून घेण्यावर लक्ष केंद्रीत करून ग्राम आणि प्रभाग पातळीवर पर्जन्यमानाचे नमुने किंवा जमिनीच्या आरोग्याचा मागोवा घेणाऱ्या कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग उपक्रम हाती घेऊन 'जागतिक पर्यावरण दिन २०२६' अशा महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर जगाला दिशा देण्याचे काम महाराष्ट्र करू शकतो असे अंत्यन्त विश्वास दर्शक मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त करूनजमिनीचे पुनरुज्जीवन, वाळवंटी करणाचा सामना करणे आणि दुष्काळ-प्रतिकार क्षमता निर्माण करणे यांच्या महत्त्वाचे अर्थ समजून घेऊन,व्यक्ती पर्यावरणीय शाश्वततेसाठी महत्वाचे योगदान देऊ शकतात म्हणुन कणखर आणि शाश्वत भविष्य घडवण्याच्या दिशेनेकेलेली प्रत्येक छोटी कृतीही मोलाची ठरू शकते असे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६


## श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मोठया उत्साहात साजरा



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयाचा विद्यापीठीय परीक्षा मार्च/एप्रिल 2026 चा बी.एड. प्रथम वर्षाचा निकाल 100 % लागला असुन व द्वितीय वर्षाचा निकाल 91% लागला असून संस्थेचे अध्यक्ष मा. विनायकराव पाटील साहेब याच्या हस्ते बी.एड. द्वितीय वर्षात महाविद्यालयात अनुक्रमे गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या बिराजदार प्रतिक्षा सुभाष, सास्तुरे नौशिन महमंदसाब,कुलकर्णी गार्गी सुरेश आणि प्रथम वर्षात महाविद्यालयात अनुक्रमे गुणांनुक्रम प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या बेळंबे राणी पंढरी,भुरे हिंदवी देवराज, पाटील प्रिती बालाजी या विद्यार्थिनीचा संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरपे, आदर्श महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. राम सोलंकर व प्रा. डॉ.लक्ष्मण बिराजदार आदी उपस्थित होते.

## जमशेदपूरच्या नामांकित संस्थेत एमबीएसाठी प्रवेश; तेजस्विनी सोनटक्के यांचा लातुरात सत्कार




**लातुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री बिल्डिंग मटेरियल्स अँड हार्डवेअर फॅब्रिकेटर्स आणि मित्र परिवाराच्या वतीने, जमशेदपूर (झारखंड) येथील देशातील नामांकित व्यवस्थापन संस्थेत एमबीए (MBA) प्रवेश मिळवलेल्या कु. तेजस्विनी नागेश सोनटक्के यांचा गौरवपूर्ण सत्कार सोहळा द अमला, रेस्टॉरंट अँड बँकवेत्स येथे बुधवारी (ता.3) रोजी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम.आय.डी. एस.आर. दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हणमंतराव कराड होते. प्रमुख अतिथी म्हणून शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, रामेश्वरच्या कार्यकारी संचालिका आशा कराड, मातोश्री कमलबाई सोनटक्के, नागेश सोनटक्के, सुनिता सोनटक्के, तेजस्विनी सोनटक्के यांची उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, स्वप्ने ती नसतात जी झोपेत पडतात, तर स्वप्ने ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत. तेजस्विनीने आपल्या जिद्दीने आणि मेहनतीने हे सिद्ध केले आहे. यश हे कायमस्वरूपी नसते, तर ध्येय गाठण्याचा प्रवास सुरू ठेवण्याचे धाडस महत्त्वाचे असते. तेजस्विनीने उच्च शिक्षण घेत असताना आपली संस्कृती आणि मातीचे देणे विसरू नये, अशी भावनाही मान्यवरांनी व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना तेजस्विनी सोनटक्के म्हणाली की, आज मिळालेल्या या यशाची परंपरा मी भविष्यातही कायम ठेवीन. लातूर पॅटर्नचा दबदबा टिकवून, कुटुंब आणि समाजाच्या ऋणात राहून सामाजिक बांधिलकी व नैतिक मूल्ये जोपासण्याचा माझा कायम प्रयत्न राहील.कार्यक्रमात डॉ. महादेव गव्हाणे, डॉ. महेश मोटे, आशा कराड, रामराव सोनटक्के, नागेश सोनटक्के यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप डॉ. हणमंतराव कराड यांनी केला. याप्रसंगी गणेश कलशेट्टी, नवनाथ पिसाळ, प्रल्हाद रोडगे, सीए राहुल धरणे, इंजिनिअर एल. जी. कदम आदींची उपस्थिती होती. उमाकांत सोनटक्के, निळकंठ सोनटक्के, शिवगंगा सोनटक्के, मीनाताई आबंदे, आदिती कोरे, मन्मथ वलांडे, आर्या वलांडे, दिनेश पाटील, सतीश गायकवाड, धनाजी तोडकर, डॉ. डी. डी. गायकवाड, अंगद पवळे, महादेव शिंदे, अर्जुन धुळेकर आदींनी पुढाकार घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कमलाकर मोटे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. देवदत्त मुंडे यांनी केले, तर आभार हनुमान रांदड यांनी मानले. विद्यार्थी, पालक, नातेवाईक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६


# "कर्तृत्व असे करावे..."

कर्तृत्व असे करावे, त्याचा असावा माज; खिजवून टाकावे स्वार्थाने बरबटलेले आज।

ते असतील स्वकीय किंवा असतील परकीय,
सत्याच्या तेजापुढे वाटावा त्यांना हेवा।
स्वतःचीच वाटावी त्यांना लाज,
जेव्हा पाहतील तुम्ही संघर्षातून उभा केलेला साज।

जळफळाट होईल, वाटेल स्वतःची लाज
मुरडतील दाटूनच नाक
तेव्हा विजय तुमचाच होईल
असे करावे काम

कर्तृत्व असे नसावे केवळ शब्दांचे खेळ,
कर्मांच्या घामातूनच उभे राहतात यशाचे मेळ।
वादळे येतील वाटेवर,
काटेही पसरतील रानभर,
पण पावलांची जिद्द असेल,
तर पर्वतही होतील नम्र क्षणभर।

स्वार्थाच्या बाजारात माणुसकी विकणारे अनेक,
पण मूल्यांच्या पायावर उभे राहणारेच ठरतात नेक।
अंधाराशी झुंजताना ज्योत स्वतःच व्हावे, इतरांच्या मार्गासाठी आयुष्य दीपस्तंभ बनवावे।

कष्टांचे सोने करावे, परिश्रमांचा गंध दरवळावा, यशाच्या उंच शिखरावर नम्रतेचाच ध्वज फडकावा।

नको संपत्तीचा गर्व, नको पदांचा गवगवा, कर्तृत्वाची खरी उंची माणसांच्या मनात जपावा।

जखमा असतील छातीवर, अपयशाचेही डाग असतील, पण त्याच अनुभवांच्या ठिणग्यांतून नव्या विजयांचे सूर उमटतील।

जगण्याला अर्थ यावा, नावाला मिळावा मान, असे काही करून जावे की स्मरणात राहावा प्रत्येक श्वास अन् प्राण।

कर्तृत्व असे करावे, त्याचा असावा माज; पण त्या माजामध्येही नसावा अहंकाराचा साज।

उन्नतीच्या प्रत्येक पावलावर माणुसकीची असावी साथ, स्वतः उजळताना उजळावी इतरांचीही वाट।

असे जीवन जगावे, असे इतिहास घडवावे, की काळाच्या पानांवर आपले अस्तित्व कोरून जावे।



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**+९१ ९४२१२ ४५३०९**

## सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी यांची इंडियन आर्मी मध्ये निवड

**गोषेगाव** : मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील विद्यार्थी अजय सोनाजी खरात (कायगाव) व मंगेश रामकिसन वाकेकर (गोषेगाव ) तसेच गौरव पांडुरंग गायकवाड हे तिघेही अत्यंत मेहनत आणि कठोर परिश्रम घेऊन या इंडियन आर्मी यामध्ये यांची निवड झाली. यांचे शिक्षण सत्यशोधक विद्यालय येथे झालेले असून निवड झाल्याबद्दल प्राचार्य श्री. सुनीलजी वाकेकर साहेब व सर्व शिक्षक वृंद यांचे आभार मानले, त्यांनी सांगितले की हे यश आम्हाला विद्यालयातील शिक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार मिळाले याचा आम्हाला आनंद आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## नाही कोणाला भरोसा

काळाचा डाव जगात,
कधी कुणाला कळतो.
तरीही जगताना माणूस,
का बरे सदोदित पळतो. 1

नाही कोणाला भरोसा,
क्षणभरच्या जगण्याची.
धाव धाव धावून माणूस,
करतो तयारी मरण्याची. 2

धावतांना माणसाची,
जगणेच जाते राहून.
सरते शेवटी दुःख होते,
स्वतःची अवस्था पाहून. 3

विचार करता कळले नाही,
कोणासाठी मी धावलो.
पळता पळता शेवटी,
मरणाच्या दारात पावलो. 4

म्हणून म्हणतो माणसा
सदा स्वतःसाठी जगावे
जगता जगता जगाकडे
खूप आनंदाने बघावे. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## पर्यावरण

पर्यावरणाची कुणी
करू नका हानी
अन्यथा ढगातून
कसे पडणार पाणी

प्लॅस्टिकच्या पिशव्यांना
घाला आता आळा
भविष्यात वाढतील
प्रदूषणाच्या झळा

पाणी म्हणजे जीवन
वापर करा जपून
दुरुपयोग केल्यास
जाइल लवकर संपून

पक्ष्यांची घरटी
मोडू नका कुणी
मंजुळ किलबिलाट
कसा येईल काणी ?

पशु पक्षी वृक्ष वेली
निसर्गाचा ठेवतात समतोल
पण दुष्ट माणसाला
केव्हा कळणार मोल ?



**- रविंद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## जिंतूर आत शिवकालीन युद्ध कलाचे प्रशिक्षण संपन्न

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरामध्ये अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर “छत्रपती शासन” या शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आलेली आहे.आजच्या बदलत्या काळानुसार महिला व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनलेला असून स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण काळाची गरज बनली आहे. हीच गरज लक्षात घेऊन ६ वर्षापुढील मुले मुली, तसेच युवक-युवतींसाठी, महिला पुरुष यांना शिवकालीन पारंपरिक युद्धकला व स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी, नेमबाजी तसेच शारीरिक तंदुरुस्ती व शिस्त यांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ जून २०२६